# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 15.06.2012 (का.प.क्र.-3) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

शुक्रवार दिनांक 15.06.2012 रोजी मा.सभापती श्री.विकास रतनलाल जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.30 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.प्र.आयुक्त, श्री.अजय चारठाणकर, प्र.नगर सचिव तथा उपआयुक्त (प्र) श्री.रविंद्र निकम यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
02. स. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
03. स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
04. स. श्री.आगा खान मिया खान
05. स. श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
06. स. श्रीमती राजपुत प्राजक्ता विश्वनाथ
07. स. श्रीमती घडमोडे सविता भगवान
08. स. श्री.कुचे नारायण तिलोकचंद
09. स. श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
10. स. श्री. खान अक्रम करीम खान
11. स. श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
12. स. श्री.मो.मुजीबोद्दीन कदीरोद्दीन
13. स. श्रीमती निलाबाई देविदास जगताप
14. स. श्री.समीर सुभाष राजुरकर

**चर्चा :**

मा.सभापती :सभा तहकूब करण्यात येते.
:तहकूब सभा सकाळी 11.35 वाजता सुरू

श्री.नारायण कुचे :13 व्या वित्त आयोगातुन डस्टबीन खरेदी करण्यात आलेले आहे. मा.सर्वसाधारण सभेने डस्टबीन खरेदी करण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आलेला आहे. सदरील डस्टबीनची गुणवत्ता खराब असुन या बाबत सभागृहात खुलासा करण्यात यावा.

श्री.बाळासाहेब मुंडे :डस्टबीनची गुणवत्ता चांगली असायला हवी. डस्टबीनला अनेकवेळा हाताळले जाणार आहे.

मा.सभापती :डस्टबीन खरेदी, वाटप व इतर बाबी बाबत खुलासा करण्यात यावा.

उप अभियंता (श्री.सिरसाठ) :13व्या वित्त आयोगातुन 1000 बीन्स खरेदी केलेले आहे. 500, तिरूपती इलेक्ट्रीकल्स यांचेकडून व 500 क्रीश एजन्सीकडुन खरेदी करण्यात आलेल्या आहे. प्रत्येक वार्डात 150 प्रमाणे बीन्स वाटप केलेल्या आहेत. 100 बीन्स यांत्रिकी विभागात जमा आहेत.

श्री.नारायण कुचे :बीन्स किती मागविण्यात आल्या होत्या त्याबाबतची गुणवत्ता कुणाकडून तपासण्याी आलेली आहे.

**मा.सभापती :स्पेसिफिकेशन प्रमाणे बीन्सची सल्पाय झालेला आहे काय?**

**उप अभियंता (श्री.सिरसाठ) :en841 च्या स्टॅंडर्ड प्रमाणे purchase केलेले आहे. टेंडरची परवानगी त्याप्रमाणे होती त्याप्रमाणे त्याच स्टॅंडर्डचा सप्लाय झालेला आहे. जर्मनी आणि फ्रान्स च्या कंपनीमधुन टेस्ट होऊन आलेले आहे. एकुण 48 लाखाचे बिन्स खरेदी केलेले आहे.**

**श्री.नारायण कुचे :बीन्सचे वेट किती असले पाहिजे.**

**श्री.गिरजाराम हाळनोर :प्रत्येक प्रभागात 150 प्रमाणे डस्टबीन वाटप केलेले आहे. प्रभाग अधिकारी यांनी वार्डात डस्टबीन वाटप केलेले आहे का? खुलासा करण्यात यावा.**

**उप अभियंता (श्री.सिरसाठ) :वेट बरोबर आहे. बीन्सचे वेट घेऊन सभागृहास माहिती देण्यात येईल.**

**मा.सभापती :जी माहिती आहे ती बरोबर देण्यात यावी.**

**श्री.बाळासाहेब मुंडे :सॅम्पलप्रमाणे बिन्स आलेल्या आहेत का?**

**उप अभियंता (श्री.सिरसाठ) :सॅम्पलप्रमाणे बिन्स आलेल्या आहेत.**

**मा.सभापती :याबाबतची सर्व तपासणी करून येणाऱ्या स्थायी समितीमध्ये अहवाल देण्यात यावा. शहरातील नागरीकांसाठी ही सुविधा देण्यात येत आहे. डस्टबीनची गुणवत्ता चांगली असायला हवी. जो पर्यंत निर्णय येत नाही. तो पर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात येवु नये. वार्ड वाईझ खुलासा करण्यात यावा.**

**वार्ड अधिकारी (अ) :150 बीन्स प्राप्त झालेले आहे. प्रत्येक नगरसेवकांच्या वार्डाला प्रत्येकी 10 याप्रमाणे वाटप करण्यात आलेले आहे.**

**वार्ड अधिकारी (क) :150 बीन्स प्राप्त झालेले आहे. प्रत्येकी 8 बीन्स प्रती नगरसेवकांच्य वार्डाला वाटप करण्यात आलेल्या आहेत.**

**वार्ड अधिकारी (ड) :150 बीन्स प्राप्त झालेले आहे. 51 बीन्स वाटप केले. इतर बीन्स वाटपाची कार्यवाही सुरू आहे. 14 बीन्स रोडसाईडला ठेवण्यात आलेले आहेत.**

**वार्ड अधिकारी (इ) :240 लिटरच्या 150 बीन्स प्राप्त झालेले आहे. नगरसेवकांच्या मागणीप्रमाणे वाटप केलेले आहे. 25 बीन्स शिल्लक आहे.**

**श्रीमती प्राजक्ता राजपुत:दोन वर्षापासून महिला व बालकल्याण समिती अंतर्गत पिको फॉल मशीन व सायकल वाटप का करण्यात आलेले नाही. तसेच गेल्या दोन वर्षापासून महिला व बालकल्याण निधी बाबत तसेच तो कुठे वापरण्यात आला आहे. खुलासा करण्यात यावा.**

**उपआयुक्त (प्र) :एक महिण्यापुर्वी श्रीमती मेघना जोगदंड यांना प्र.महिला व बालकल्याण अधिकारी म्हणुन चार्ज देण्यात आला होता. त्यानंतर शासनाकडील अधिकारी श्रीमती आंधळे यांचे कडे चार्ज देण्यात आलेला आहे. अतिरिक्त चार्ज दिलेला असल्यामुळे त्या नियमित मनपाच्या कार्यालयात येत नाही. पिको फॉल मशीनबाबतची संचिका दोन वर्षापासून कार्यरत आहेत. 542 मशीन खरेदीचा ठराव पास झालेला आहे. दोन वेळेस टेंडर होऊन अंतिम झालेले आहे. त्यानंतर सर्वसाधारण सभेची मान्यताही मिळालेली आहे. मशीनच्या संदर्भात आरसी आली. निवीदा आणि आरसीमध्ये 1500 ते 1700 रूपये कमी दर असल्यामुळे सर्वसाधारण सभेमध्ये ती रद्द करून आरसीच्या दराप्रमाणे आरसी धारकास कार्यादेश दिलेले आहे. परंतु आरसी धारकाचे म्हणने आहे की, एलबीटी महानगरपालिकेने माफ करण्यात यावी. याबाबत संबधीताशी वारंवार पत्रव्यवहार झालेला आहे. एलबीटी माफ**

करण्यासंदर्भात एलबीटी प्रमुख यांना एलबीटी माफ करण्यासंदर्भात पत्र दिले असता एलबीटी माफ करण्यासंदर्भात तरतुद नाही. सदर बाबत आरसीधारकास कळविण्यात आल्यावर आरसीधारक सदरची रक्कम भरण्यास तयार नाही व सदरील प्रपोजल रद्द करण्यात यावे. म्हणुन कळविण्यात आलेले आहे.

**श्री.रेणुकादास वैद्य** :आरसीची मुदत संपलेलेली आहे का? हे तपासण्यात येऊन गरजु महिलांना ताबडतोब मशीनचे वाटप करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

**श्री.नारायण कुचे** :टेंडरमध्ये पैसे देण्याची हमी देण्यात येत नाही. प्रशासनाने संबधीतास ब्लॅकलिस्ट करून नविन निवीदा काढावयास पाहिजे होते.

**मा.सभापती** :आरसी व्हॅलिड आहे का? तपासण्यात यावे. नागरीकांचा हिताचा विषय आहे. एलबीटी लेऑफ करू शकतो.

**श्रीमती प्राजक्ता राजपुत**:महिला बाल कल्याण निधीचे काय झाले?

**मा.सभापती** :महिला व बाल कल्याण समितीसाठी पुर्ण वेळ अधिकारी नेमण्यात यावा.

**श्रीमती सविता घडमोडे** :ड्रेनेज लाईनच्या कामात वेगवेगळे रेट याची चौकशी करण्यात यावी.

**मा.सभापती** :संबधीत अधिकारी यांना दालनात बोलावुन स्वतंत्र चर्चा करण्यात येईल.

**श्री.गिरजाराम हाळनोर** :दशमेश नगर येथील नाल्यावरील अतिक्रमणाबाबत प्रशासनाने कोणती कार्यवाही केली. नाल्यामध्ये आजही माती ढकललेली दिसुन येत आहे. नाल्याची रूंदी फिक्स करून ताबडतोब वॉल बांधण्यात येऊन जागा ताब्यात घेण्यात यावी.

**मा.सभापती** :प्रशासनाने जे पत्र दिलेले आहे. त्याबाबतीत सभागृहात खुलासा करण्यात यावा.

**उप अभियंता (न.र.)** :सिटी सर्वे ऑफिसमधुन नाल्याची हद्द निश्चित करावी लागेल. हद्द निश्चित झाल्यावर रिटनिंग वॉल बांधुन हद्द निश्चित करता येईल. अंदाजपत्रक तयार झालेले असुन पुढील प्रशासकीय कार्यवाहीस्तव पाठविण्यात आलेले आहे.

**श्री.समीर राजुरकर** :आस्थापना विभागास लाड समिती बाबत प्रश्न विचारले असता आस्थापना विभागातील वरिष्ठ लिपीक यांनी मा.सभापती यांना त्यांच्या स्वाक्षरीनिशी पत्र दिलेले आहे. सभापती यांना असे पत्र लिहिण्याचा अधिकार आहे का? गरीब लोकांना रस्त्यावर फिरवीत आहे. शासनाचा जी.आर.असतांना संचिका दाबुन ठेवण्यात येत आहे. वरिष्ठ लिपीक यांना सभागृहात बोलविण्यात यावे. वरिष्ठ लिपीक यांनी पत्र पाठविल्यानंतर आस्थापना अधिकारी-2 पत्र पाठवित आहे.

**श्री.नारायण कुचे** :सदरील बाब खेदजनक आहे. एक संचिका दिड वर्षापासून प्रलंबित आहे. सदरील कर्मचाऱ्यांचे आयुष्य कमी असतो. लाड समितीच्या अंतर्गत वारसा हक्कानी नौकरी लावण्यासाठी वर्षनुवर्ष संचिका प्रलंबित ठेवण्यात येतात. पैसे मागीतले जातात. हे मी आरोप नाही तर सिध्द करू शकतो. सभागृहात बोलविण्यात यावे.

**मा.सभापती** :वरिष्ठ लिपीक यांना सभागृहात बोलविण्यात यावे.

**श्री.समीर राजुरकर** :व.लि.यांनी पत्र दिले आहे की, दिनांक 4.11.2011 पासून आस्थापना-2 मध्ये रूजु झालेलो आहे. लाड समितीच्या अंतर्गत नियुक्तीच्या संचिका हाताळलेल्या नाहीत म्हणून विभाग प्रमुखांना माहिती न देता कळविण्यात आले आहे.

**श्री.रेणुकादास वैद्य** :गेल्या पाच वर्षात ज्या काही नौकऱ्या लावल्या गेल्यात त्याचे ऑडिट झाले पाहिजे. यामध्ये अनेक कर्मचारी अधिकारी अडकलेले आहेत. सदरील प्रकार मनपासाठी घातक व गंभिर स्वरूपाचा आहे. 5 लाख रूपये घेण्याचे अनेक उदाहरण दिसुन येईल. अनुकंपा धर्तीवर दिलेल्या नौकरीचे सविस्तर चौकशी व्हावी.

**मा.सभापती** :आस्थापना अधिकारी-2 यांना पत्राबाबत काही माहीती आहे का?

**आस्थापना अधिकारी-2** :याबाबतीत मला काही न विचारता श्री.खरे यांनी पत्र दिलेले आहे आणि परस्पर देण्यात आलेले आहे. पत्र दिल्यानंतर संध्याकाळी 7 वाजता पत्र दिल्याचे कळाले.

**श्री.रेणुकादास वैद्य** :परस्पर पत्र पाठविले जाते. ही गंभिर बाब आहे.

**श्री.समीर राजुरकर** :विभाग प्रमुख असतांना व.लि.परस्पर पत्र पाठविले जाते.

**मा.सभापती** :विभागातील सर्व पत्र लिपीक सही करतो का? नांव काय आहे.

**आस्थापना अधिकारी-2**: श्री.एम.बी.खरे

**सभापती** :विभाग प्रमुख कोण आहे.

**आस्थापना अधिकारी-2** :विभाग प्रमुख उपआयुक्त (प्र) आहेत.

**उपआयुक्त (प्र)** :या संदर्भातील कॉपी आलेली असुन आस्थापना विभागातील वरिष्ठ लिपीक श्री.एम.बी.खरे यांनी अशा प्रकारचे पत्र देउ नये. ही बाब चुकीची आहे. संबधीत कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात यावी म्हणुन आस्थापना अधिकारी-2 यांना तोंडी आदेश देण्यात आले. त्यानंतर आस्थापना अधिकारी-2 यांनी कारणे दाखवा नोटीस काढलेली आहे.

**मा.सभापती** :कार्यवाही काय करणार आहे.

**उपआयुक्त(प्र)** :आस्थापना-2 चा आणि उपआयुक्त (प्र) यांचा अहवाल आस्थापना अधिकारी-1 यांचेकडे पाठविण्यात येईल. कारवाईचे अधिकार आस्थापना-1 कडे आहे. यापुर्वी बदली करावी. म्हणुन शिफारस करण्यात आलेली आहे व आता बदली करावी म्हणुन शिफारस करण्यात येईल.

**श्री.गिरजाराम हाळनोर** :बेकायदेशिररित्या काम केलेले आहे. विभागप्रमुखांना न विचारता कार्यवाही केलेली आहे. शिस्तभंगाची कारवाई करण्यात येवुन एक वेतनवाढ रोखण्यात यावी.

**मा.सभापती** :पत्र देण्यापुर्वी कुणाची परवानगी घेतली होती का?

**श्री.एम.बी.खरे** :सदरील बाब अनावधानाने घडली आहे. माझ्याकडुन चुक झालेली आहे.

**श्री.समीर राजुरकर** :मा.सभापती यांना पत्रात नमुद केले की, माहे फेब्रुवारी ते एप्रिल पर्यंत आस्थापना विभागात कर्मचाऱ्यांची कमतरता असल्यामुळे या कालावधीमध्ये ज्या संचिका तयार झाल्या त्या सध्या प्रस्तावित आहेत. सदरील संचिका कुणाकडे प्रस्तावित आहे.

**श्री.एम.बी.खरे (व.लि)** :सदरील संचिका उपआयुक्त (प्र) यांचेकडे प्रलंबित आहेत.

**श्री.समीर राजुरकर** : रूजु झाल्यापासुन किती संचिका प्रलंबित आहे.

**श्री.एम.बी.खरे (व.लि)** :27 संचिका प्रलंबित आहे.

**श्री.समीर राजुरकर** :एकुण 60 संचिका प्रलंबित आहे. गेल्या 6 महिण्यांनपासून गरीब लोकांना चकरा मारायला लावत आहे. वरिष्ठ अधिकारी यांना माहिती न होता आस्थापना कमिटीमध्ये चार ते पाच संचिका पाठविल्या जातात. आस्थापना कमिटीसमोर ठेवण्याचे कालावधी निश्चित करण्यात यावा व संबधीतांचे प्रश्न तात्काळ मार्गी लावण्यात यावे.

**मा.सभापती** :संपुर्ण माहिती एक तासाच्या आत देण्यात यावी. स.सदस्यांनी जो विषय मांडला आहे तो गंभिर स्वरूपाचा आहे. सभागृहाची भावना लक्षात घेऊन प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी.

**श्री.रेणुकादास वैद्य** :शहरात अनेक उद्यानाची अवस्था वाईट आहे. क्रांतीचौकातील झाशीची राणी उद्यानाची वाईट अवस्था आहे. अनेक नागरीकांच्या तक्रारी आलेल्या आहेत. उद्यानाची अवस्था गार्डन रेस्टॉरन्ट सारखी झालेली आहे. वाईनशॉपमधून वाईन घेऊन अंडी भुर्जी घेऊन गार्डनमध्ये स्वाद घ्यायचा अशी अवस्था उद्यानाची झालेली आहे. सदरील परिस्थीती प्रशासनास पत्रव्यवहाराद्वारे वारंवार सांगण्यात येऊनही उद्यानाची अवस्था तशीच आहे. या ठिकाणी अद्यावयात उद्यान व्हावे. या ठिकाणी विद्यार्थी, महिलांना नागरीकांना ट्रॅफिक नियमांचे माहिती होण्यासाठी ट्रॅफिक नियमांचे उद्यान झाशीची राणी उद्यान येथे प्रस्तावित करावे. सदरील उद्यान विकसीत करण्यासाठी पुरेसा निधी आणि संबधीत विभागाला त्वरीत सूचना देण्यात याव्यात. अंदाजपत्रक त्वरीत तयार करण्यात यावे. तज्ञ सल्लागाराची यामध्ये नेमणुक करण्यात यावी.

**श्री.गिरजाराम हाळनोर** :प्रतापनगर स्मशानभुमी येथे 12 व्या वित्त आयोगातुन 15 लाखाचे विकासाचे काम प्रस्तावित करण्यात आले होते. टेंडर झालेले असुन गुत्तेदाराने गेल्या दोन वर्षात ओटा आणि कॉलम बांधलेले आहे. हया शिवाय कुठलेही काम केलेले नाही. याबाबत प्रशासनास माहिती देण्यात आली. कामाची मुदत किती दिवसांची आहे किती दिवसात काम करायला हवे होते. काम करणार नसेल तर प्रशासनामार्फत काय कार्यवाही करण्यात येणार आहे.

**श्री.समीर राजुरकर** :श्री.सारंग टाकळकर यांनी औरंगाबाद व्हिजन डॉक्युमेंट तयार केले आहे. श्री.टाकळकर यांना ट्रॅफिक उद्यान तयार करत असतांना तज्ञ सल्लागार म्हणुन नेमण्यात यावे. प्रत्येक मनपामध्ये ट्रॅफिक कंट्रोलसाठी डेप्टी इंजिनिअरची नेमणुक करण्यात आलेली आहे. औरंगाबाद मनपामध्ये ट्रॅफिकच्या अधिकाऱ्यांशी समन्वय साधण्यासाठी कुणीही नाही. आगामी काळात ट्रॅफिकची समस्या अधिक भेडसवणार आहे. ट्रॅफिक पोलिस आणि मनपा यांच्यात समन्वय साधण्यासाठी मनपाचा एक स्वतंत्र अधिकारी असावा. यामुळे शहरातील ट्रॅफिक सुस्थितीत व ट्रॅफिकचे नियोजन करता येईल.

**श्री.मोहन मेघावाले** :स्वामी विवेकानंद गार्डन पुर्वी सिडकोमध्ये असतांना चांगली अवस्था होती. परंतु मनपामध्ये गार्डन आल्यावर त्याची वाईट अवस्था झाली आहे. गार्डनमध्ये वॉचमनसाठी असलेली रूमच्या ठिकाणी छोटेसे पोलीस चौकीची व्यवस्था झाल्यास गार्डनची दुरावस्था थांबेल. सलिम अली सरोवर येथील गार्डनची अवस्था बिकट झालेली आहे.

**श्री.रेणुकादास वैद्य** :उद्यानामार्फत प्रती वर्षी मनपास 60 लाखाचे उत्पन्न होत आहे. सदरील उत्पन्न ए वन च्या माध्यमातुन निघुन जाते. उद्यान विभाग स्वतंत्र करून त्याची कार्यप्रणाली ठेवण्यात यावी. 40 लाखामध्ये 10 वार्डामधील उद्याने विकसीत करू. यावर टेक्निकल विभागप्रमुख ठेवण्यात यावे. उद्यानात टिकीट विक्रीचे काऊंटरवर मनपाचे 35 कर्मचारी काम करतात. त्यांचे आऊटसोर्सिंग करण्यात यावे.

**श्री.विजेंद्र जाधव** :सिध्दार्थ उद्यानाचे टिकीट दर वाढविल्यामुळे मनपास 98 लाख रूपये उत्पन्न प्राप्त झालेले आहे. उद्यानातील मुलांची खेळणी पुर्णत: नष्ट झालेली आहे. सिध्दार्थ उद्यानाच्या विकासाकरीता निधी वापरल्यास अधिक उत्पन्न उद्यानाच्या माध्यमातुन मनपास मिळु शकते.

**मा.सभापती** :ट्रॅफिक उद्यानाची संकल्पना चांगली आहे. ट्रॅफिक बाबत नागरीकांना माहिती नसते. सदरील उद्यानामध्ये येऊन ट्रॅफिक बाबतची माहिती नागरीकांना होईल. क्रांतीचौकातील उद्यानाची जागा ऐतिहासिक आहे. ट्रॅफिक गार्डन विकसीत करण्यासाठी अंदाजपत्रक तयार करून येणाऱ्या सभेत माहिती देण्यात यावी. श्री.सारंग टाकळकर यांची तज्ञ सल्लागार म्हणुन नेमणुक करण्याबाबत पत्र देण्यात यावे. स.सदस्य श्री.गिरजाराम हाळनोर यांचे वार्डातील काम दोन वर्षापासून रखडलेले आहे. खुलासा करण्यात यावा.

**उपअभियंता (श्री.वझे)** :प्रतापनगर येथे स्मशानभुमी विकासासाठी 12 व्या वित्त आयोगातुन 15 लाख रूपयांची तरतुद करण्यात आलेली आहे. सन 2009-10 चे डिएसआर रेट होते. टेंडर काढण्यात आल्यानंतर काम करण्यास सुरूवात केली. एक वर्ष झालेले आहे. कंत्राटदाराचे बिल काढण्यात आलेले नाही.

**मा.सभापती** :12 वित्त आयोगातुन जे काम करण्यात आलेले आहे त्याचे बिल देण्यात आले किंवा नाही. यांची तपासणी करण्यात यावी. तसेच बिल देऊनही काम होत नसेल याबाबत चौकशी करून माहिती देण्यात यावी. पुढील सभेत माहिती सादर करण्यात यावी.

ट्रॅफिक सिग्नल कोठे लावावेत याबाबत शहर अभियंता हे बैठकीसाठी हजर राहतात.

**शहर अभियंता** :महानगरपालिकेकडे ट्रॅफिकसाठी अधिकारी आहेत.

**श्री.रेणुकादास वैद्य** :संतएकनाथ रंगमदिर येथील ट्रॅफिक एकतर्फी वाहतुकीसाठी करण्याबाबत सर्वसाधारण सभेने ठराव घेतलेला असुन एसीपी ट्रॅफिक यांनी भेट देऊन पहाणी केलेली आहे. यासंदर्भात प्रशासनाने फॉलोअप घेण्यात यावे.

**मा.सभापती** :फॉलोअप घेण्यात यावे व सभागृहास माहिती देण्यात यावी.

उद्यान विभाग इंजिनिअरींगच्या माध्यमातुन विकसीत करत आहे. ग्रीनरी करण्याचे काम उद्यान विभागातुनच करायला पाहिजे. शहरातील जे उद्यान आहे. त्यांना पुर्ण अधिकार देवु या त्यांनी संपुर्ण ग्रीनरी चे काम करण्यात यावे. पहिल्यावर्षी काही उद्यान घेण्यात यावे व त्यानंतर दुसरे उद्यान व काही कामे आऊटसोर्सिंगने करण्यात यावे. ग्रीनरीसाठी उद्यान विभाग स्वतंत्र करून त्यावर एचओडी नेमण्यात यावा. उद्यानाचे उत्पन्न उद्यानासाठीच खर्च करण्यात यावे. इतरसाठी तो खर्च करण्यात येऊ नये. मनपाचे कर्मचारी टिकीट विक्रीसाठी आहे त्या ठिकाणी त्यांना काढुन आऊटसोर्सिंगने कामे करण्यात यावी.

**श्री.आगा खाना** :दिनांक 06.06.2012 रोजीच्या बैठकीत झालेल्या निर्णयाप्रमाणे एमजीएम ते कैलासनगर येथील रोडला प्रत्यक्ष भेट देण्यात आली. रूंदिकरणात ज्यांचे घर देण्यात आले त्यांना हर्सुल येथील सर्वे क्रमांक 216 देण्यात आले. जो लेआऊट तयार करण्यात आला तो पेपरवर केला होता की, जागेवर केला होता.

**मा.सभापती** :प्रशासनाने खुलासा करण्यात यावा.

**उप अभियंता** :मा.आयुक्तांच्या आदेशान्वये श्री.पानझडे यांचे अध्यक्षतेखाली कमिटी नेमण्यात आली होती. रस्ता रूंदिकरणामध्ये बाधीत झालेले तसेच ज्या नागरीकांना कुठल्याच प्रकारचा निवारा राहीलेला नाही. कायदेशिररित्या कागदपत्र नाहीत परंतु जागेवर ताबा होता. अशा नागरीकांना लेआऊट तयार करून हर्सुल येथील मनपाच्या हद्दीतील सर्वे क्रमांक 216 वर देण्यात आले. मुळतः सर्वे क्रमांक 217 वर रितसर मान्यताप्राप्त करून घेतला होता. मार्कींग करण्यात आली होती. अलाऊटमेंटच्या वेळेस स्किम जाहिर केली त्यावेळी खाजगी व्यक्तीने आक्षेप घेऊन सदरील जागेचा ताबा असल्याचे सांगुन स्टे आणलेला आहे. विधीविभागाचा सल्ला घेतला असता सर्वे क्रमांक 217वर स्टे असल्याचे कळविण्यात आले. सर्वे क्रमांक 216ची काही जागा जिल्हाधिकारी यांचेकडुन प्राप्त झाली होती. जागेची अधिकृतता तपासून

रितसर जाहिरात देवुन त्या ठिकाणी लेआऊट तयार केरून विस्थापितांना जागा अलॉट केलेली आहे.

श्री.आगा खान :सदरील काम ऑन पेपर केलेले आहे का की, जागेवर केलेले आहे.

उप अभियंता :सुरवातीला ऑन पेपर केले त्यानंतर जागेवर जाऊन मार्कआऊट केलेले आहे.

श्री.आगा खान :सदरील जागेवर अज्ञात व्यक्तीने दादागिरी करून बुलडोझर लावुन मार्कींग काढुन टाकलेली आहे. जागेची लेवल झालेली आहे. नागरीक त्या ठिकाणी गेले असता त्यांना मार्कींग आढळुन आलेली नाही. प्रशासनाचे दुर्लक्ष आहे.

उप अभियंता :सदरील बाब अद्यापपर्यंत निर्दशनास आलेली नाही. आजच्या आज तपासणी करून माहिती देण्यात येईल.

श्री.नारायण कुचे :प्रशासनाने तातडीने कार्यवाही करून संबधीताविरूध्द ॲक्शन घेतली पाहिजे.

मा.सभापती :प्रशासनाने एचओडीसह हर्सुल येथील सर्वे नं.216 येथे प्रत्यक्ष स्थळभेट देऊन पहाणी करून स्थायी समितीसमोर अहवाल देण्यात यावा. तसेच संबधीताविरून तात्काळ गुन्हा नोंदविण्यात यावा. रस्ता रूंदिकरणामध्ये काही बाधीत लोकांना अजुनही न्याय मिळालेला नाही. त्या 13 लोकांची बैठक घेऊन सदरील नागरीकांचा प्रश्न सोडविण्यात येऊन न्याय देण्यात यावा.

श्री.गिरजाराम हाळनोर :बीओटी बाबत मागील बैठक घेण्यात आली होती. त्याबाबतीत काय निर्णय घेण्यात आलेली आहे.

श्री.समीर राजुरकर :शहानुरवाडी येथील नाल्याच्या रूंदिबाबत खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :काम चालु आहे का? खुलासा करण्यात यावा.

कार्यकारी अभियंता :तीन बीओटी प्रकल्प चालु होते.1. सिध्दार्थ गार्डन 2. शहानुरवाडी 3.रेल्वेस्टेशन, सिध्दार्थ गार्डन आणि रेल्वेस्टेशन येथील काम बंद करण्यात आलेले आहे. शहानुरवाडी येथील संबधीतांना मोबालाईझेशन पिरेड दिलेला होता. पत्र देण्यात आलेले आहे.

मा.सभापती :सिद्धार्थ उद्यान येथे काम चालु असल्याचे निर्दशनास आलेले आहे. काम बंद करण्यात यावे. काम ताबडतोब थांबविले पाहिजे.

कार्यकारी अभियंता :नाल्याबाबत नकाशा मागविण्यात आलेला आहे. काम चालु आहे.

श्री.समीर राजुरकर :काम सुरू होण्यापुर्वी नाल्याची साईझ काय होती?

कार्यकारी अभियंता :30 फुट आहे. डी.पी.मध्ये नाल्याची लाईनींगस् नाही.

श्री.समीर राजुरकर :22 ते 40 मीटर नाल्याची साईझ आहे. महानगरपालिकेचे 15000 स्के.फुट पेक्षा जास्त नुकसान झालेले आहे.

श्री.समीर राजुरकर :डिपी मध्ये नाला नाही याची माहिती घेण्यात येईल. सदरील व्यक्तव्य चुकीचे आहे. सभागृहाची दिशाभुल करण्यात येवु नये. टाऊन प्लॅनिंगच्या माध्यमातुन नाल्याची रूंदि बाबत माहिती देण्यात यावी.
महानगरपालिकेतर्फे एक जाहिर निवेदन आलेले आहे. नगर सचिव यांनी वाचुन दाखववावे.

नगर सचिव :जाहिर निवेदन वाचुन दाखवतात. (जा.क्र.मनपा/विद्युत/वार्ड इ व फ/160/ 2012, दिनांक 14.06.2012) मान्सुनपुर्व शहरातील पथदिवे बाबत.

मा.सभापती :जाहीर निवेदनामध्ये दिलेले आहे की, कामे झालेली आहे. खुलासा करण्यात यावा.

**कार्यकारी अभियंता** **:जाहिर निवेदन देण्याचा उद्देश होता की, काही जनावरे विद्युतचा धक्का लागल्याने मृत झालेली आहेत. त्यामुळे नागरीकांच्या सुरक्षीततेच्या कारणास्तव निवेदन दिलेले आहे. या वर्षी कामे झालेली नाही.**

**मा.सभापती** **:निवेदन देऊन नागरीकांची सभागृहाची दिशाभुल करू नये. जंक्शन बॉक्स, पोल बाबत माहिती दयावी.**

| | |
|---|---|
| कार्यकारी अभियंता | :जंक्शन बॉक्स, पॅनल बोर्ड, इलेक्ट्रीक पोल हे सडलेल्या अवस्थेत आहे. गेल्या 30 वर्षापासुन कामे झालेली नाही. सेव्हनहिल चे 66 पोल काढुन घेण्यात आलेले आहे. साधारणत: 7 ते 8 वर्षानंतर जे कामे करावी लागतात ती कामे झालेली नाही. |
| मा.सभापती | :निवेदनामध्ये दिलेले नंबर कुणाचे आहे. |
| कार्यकारी अभियंता | :अधिकाऱ्यांचे नंबर आहे. |
| मा.सभापती | :ताबडतोब या कामाचे अंदाजपत्रक काढण्यात यावे. जीटीएल ला पैसे भरल्यानंतरही रस्त्यामध्ये पोल आहे. पोल हलविण्यात आले पाहिजे. जीटीएलची समन्वय साधण्यात यावा व काम पुर्ण करावे.<br>पिको फॉल मशिन, आरसीची मुदत केव्हा पर्यत आहे. |
| उपआयुक्त(प्र) | :आरसीची मुदत 30 जुन 2012 पर्यंत आहे. |
| मा.सभापती | :15 दिवसात मशिन सप्लाय करत असेल तर एलबीटी बाबत विचार करण्यात येईल. 15 दिवसात पुरवठा करू शकतो काय? याबाबतची माहिती घेऊन पुढील कार्यवाही करण्यात यावी. |
| उपआयुक्त(प्र) | :एलबीटी रद्द करावी की नाही या संदर्भाने मा.आयुक्तांनी उपआयुक्त(प्र) यांचे अध्यक्षतेखाली कमिटी गठीत करण्यात आली होती. कमिटीने असा निर्णय दिलेला आहे की, एलबीटी मनपातर्फे भरण्यात येईल. |
| मा.सभापती | :संचिकेवर योग्य तो निर्णय घेण्यात येईल. |
| श्री.समीर राजुरकर | :महानगरपालिकेतर्फे जे काही प्रोजेक्ट घेण्यात आलेले आहे. (एएमटी, रॅम्के, स्पेक, इआरपी, प्रेगनंन्ट महिलासाठीचे टॅब, लाईटचे प्रोजेक्ट, विमा योजना,) सदरील विषयात ठोस निर्णय घेतलेला नाही. आर्थिक नुकसान झालेले आहे. यामध्ये जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. नियंत्रण ठेवले पाहिजे. |
| मा.सभापती | :येणाऱ्या सभेमध्ये सदरील प्रकल्पाबाबत संबधीत अधिकारी यांनी माहिती सादर करण्यात यावी. चर्चा करण्यात येईल. |
| श्री.शेख अ.असद | :दिल्ली गेट येथील रोड वाईंडीग काम झालेले असुन बाजुचे झाले तोडण्यात आले नाही त्यामुळे जुने फर्निचर विक्रेते बसतात त्यामुळे जाण्यायेण्यास अडचण येते. तसेच हिमायतबाग येथील फुड रिसर्च सेंटरने भिंतींचे बाधकाम केलेले आहे त्याबाबत परवानगी घेण्यात आलेली नाही. नेहर ए अंबारीचा काही भाग त्यामध्ये आलेला आहे. |
| मा.सभापती | :संबधीत गुत्तेदाराला यासंदर्भात ब्लॅकलिस्ट केलेले आहे. स.सदस्यांच्या म्हणण्याप्रमाणे काही अडीअडचणीमुळे त्या ठिकाणी काम करू शकला नाही. संबधीत विभागास विनंती आहे की, संबधीत गुत्तेदाराचा सहानुभूतीपुर्वक विचार करून योग्य निर्णय घ्यावा.<br>मुख्यलेखाधिकारी नविन रूजु झालेले आहेत. त्यांनी त्यांचा परिचय करून द्यावा. |
| मुख्यलेखाधिकारी | :अशोक थोरात जालना येथे स्थानिक विधी लेखा या पदावर तीन वर्ष काम केलेले आहे. मनपा औरंगाबाद येथे बदलीने आलेलो आहे. |
| मा.सभापती | :सभागृहाच्या वतीने मुख्यलेखाधिकारी यांचे स्वागत करण्यात येते.<br>दिल्ली गेट येथे फुड सेंटरचे कामाबाबत ताबडतोब प्रशासनाने स्थळभेट देऊन काम थांबविण्यात यावे. |
| श्री.आगा खान | :अतिक्रमण विभागास सक्षम अधिकारी देण्यात यावा. |
| मा.सभापती | :प्रशासकीय विभागास एक सक्षम अधिकाऱ्याची नेमणुक करण्यात यावी. |

**विषय क्र. 03 :** (विषय क्र. 02 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि. 06/06/2012 रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)

**दिनांक 21/02/2011 (का.प.क्र.12), 14/03/2011 (का.प.क्र.13), 21/03/2011 (का.प.क्र.14), 22/03/2011 (का.प.क्र.15), 13/04/2011 व 15/04/2011 (दि.13/04/2011 ची तहकुब सभा) (का.प.क्र.16) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.**

**टिप : (इतिवृत्तांताच्या प्रती यापूर्वीच सर्व संबंधीतांना वितरीत करण्यांत आलेल्या आहेत.)**

**मा.सभापती : स्थगीत.**

**ठराव :**

**प्रस्तुत प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.**

**विषय क्र. 04 :**

**आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, वार्ड क्र.96, मोहल्ला सिल्कमिल कॉलनी भागात रेल्वे फ्लाय ओव्हर ब्रीज खालील रस्त्याचे खडीकरण करणे, डांबरीकरण करणे व रस्त्यालगत पावसाचे सांडपाणी काढण्यासाठी 450 मि.मी. व्यासाची आर.सी.सी. स्टॉर्म वॉटर ड्रेन बांधणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.5003520/- च्या अंदाजपत्रकास ठराव क्र. 616 दि.01/03/2012 अन्वये मा.सर्वसाधारण सभेची मंजुरी प्राप्त झाली असून, सदरील कामासाठी निविदा मागविली असता, निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण दोन निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत सदरील दोन निविदा दर भरून प्राप्त झाल्या असून, त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | गुत्तेदाराचे नांव | निविदा दर (अंदाजपत्रकातील दरापेक्षा) |
|---|---|---|
| 01. | कालिका इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर | 4.51% जास्त दराने |
| 02. | आदिनाथ कंस्ट्रक्शन | 35.01% जास्त दराने |

**वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी मे.कालिका इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर यांचे निविदाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी तथापी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.51% जास्त आहे. तथापी मा.आयुक्तांकडे झालेल्या निविदा दराचे वाटाघाटीअंती प्राप्त निविदा दर 4.51% जास्त ऐवजी 4.00% जास्त दरास मान्यता झालेली आहे.**

**करीता मे.कालिका इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर यांची 4.00% जास्त दराची निविदा मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.**

**मा.सभापती :विषय मंजूर.**

**ठराव :**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.96, मोहल्ला सिल्कमिल कॉलनी भागात रेल्वे फ्लाय ओव्हर ब्रीज खालील रस्त्याचे खडीकरण करणे, डांबरीकरण करणे व रस्त्यालगत पावसाचे सांडपाणी काढण्यासाठी 450 मि.मी. व्यासाची आर.सी.सी. स्टॉर्म वॉटर ड्रेन बांधणे या कामाकरीता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.कालिका इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदर काम त्यांचेकडुन अं.प. दरापेक्षा 4.00% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

## ऐनवेळेचे विषय

**विषय क्र. 05 :**

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्र मातंसं/प्रक्र २८/३९ दि ३ डिसेंबर, २००८ अन्वये महाराष्ट्र शासनाने राज्यातील सहा विभागीय क्षेत्रांत ई सेवा केंद्र स्थापित करण्यासाठी खाजगी संस्थाची नियुक्ती केली आहे औरंगाबाद विभागासाठी मे सिएमएस कॉम्प्युटर्स लि मुंबई यांची नियुक्ती करण्यात ओलेली आहेत. मा. सचिव, सा.प्र. माहिती तंत्रज्ञान

विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि ३०/५/२०१२ रोजी कळविल्या प्रमाणे महा-ऑन लाईन हि शासन पूरस्कृत संस्था आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेच्या वार्ड अ ते फ मधून जन्म व मृत्यू प्रमाणपत्र, बेबाकी प्रमाणपत्र मालमत्ता कर वसुली, पाणीपट्टी कर वसुली तसेच इतर विभागाकडून नागरिकांना वेगवेगळया सुविधा पुरविल्या जातात. या सुविधा उपलब्ध करून घेण्यासाठी नागरिकांना महानगरपालिकेच्या विविध सहा वार्ड कार्यालय तसेच विविध विभाग आणि एक सुविधा केंद्र या ठिकाणी जावे लागते. या सुविधा महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णय क्रमांक मादस/२०१२/प्रक्र-१५२/३९, दिनांक २३ मे २०१२ नुसार सेतू सुविधा केंद्रामार्फत या सुविधा नागरिकांना उपलब्ध करून देण्या बाबत विविध विभागांचे विभाग प्रमुख व सुविधा पुरविणाऱ्या कंपनीचे प्रतिनिधी यासह वेळोवेळी बैठका घेण्यात आलेल्या आहेत.

सी.एम.एस. कॅम्प्युटर्स लि. यांच्यातर्फे दि.१३ जुन २०१२ रोजी पत्र देवुन प्रत्येक सुविधा देण्यासाठी रू.२०/- + १२.३६ टक्के सेवा कर एकूण रू.२२.४७/- असे दर कळविले आहे. त्याचप्रमाणे महा-ऑनलाईन लि., मुंबई यांनी दि.१३ जुन २०१२ रोजी भरणा करावयाच्या प्रकारामध्ये दर कळविले आहेत, ते खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| **०१.** | इंटरनेट पेमेंट | रू.५/- प्रत्येक रू.५००/- पेक्षा कमीच्या कामासाठी |
| **०२.** | इंटरनेट पेमेंट | रू.१०/- प्रत्येक रू.५००/- किंवा त्यापेक्षा जास्तीच्या कामासाठी |
| **०३.** | डेबीट-कार्ड | रू.१८/- प्रत्येक कामासाठी |
| **०४.** | क्रेडीट कार्ड | रू.१ टक्के शहरी देयकावर किंवा कमीत कमी रू.५/- प्रती कामासाठी |

या सुविधा नागरिकांना त्यांच्या घरा जवळील सेतू सुविधा केंद्रामार्फत सशुल्क सेवा उपलब्ध करून देण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. या प्रस्तावामध्ये औरंगाबाद महानगरपालिकेच्या क्षेत्रातील नागरिकांना महानगरपालिके तर्फे पुरविल्या जाणाऱ्या विविध सेवापैकी खालील प्रमाणे सेवा देण्यात येणार आहेत.

| | |
|---|---|
| **आरोग्य विभाग** | जन्म प्रमाणपत्र, मृत्यू प्रमाणपत्र, नर्सिंग होम रजिस्ट्रेशन, आरोग्य व स्वच्छता नाहरकत प्रमाणपत्र, सोनोग्राफी प्रमाणपत्र, जैविक कचरा प्रमाणपत्र |
| **कर निर्धारक व संकलक** | मालमत्ता नामांतर, बेबाकी प्रमाणपत्र |
| **नगर रचना विभाग** | शहरी व सिडकोभागासाठी बांधकाम परवानगी, शहरी व सिडको भोगवटा प्रमाणपत्र, एकत्रीकरण / पोट विभागणी, रेखांकन, बांधकाम परवानगी, भोगवटा प्रमाणपत्र, अंतिम रेखांकन परवानगी, बांधकाम परवानगी नुतनीकरण |
| **पशुसंवर्धन विभाग** | नविन मांस विक्री परवाना, मांस विक्री परवाना नुतनीकरण, मनपा हद्दीत श्वान परवाना, प्राणी दत्तक योजना |
| **उद्यान विभाग** | वृक्षतोड परवाना, वृक्षांच्या पुर्नरोपनासाठी परवानगी |
| **प्रकल्प विभाग** | सुवर्ण जयंती रोजगार योजने अंतर्गत दारिद्रय रेषेखालील कुटूंबांना प्रमाणपत्र वाटप करणे |
| **आस्थापना विभाग-२** | तक्रार निवारण, अभिलेख्यांचे सत्यप्रती |
| **अति.शहर अभियंता विभाग** | जलतरण मेंबरशीप (स्विमींग पूल) |
| **शिक्षण विभाग** | वाचनालय मेंबरशीप |
| **अग्निशमन विभाग** | अग्निशमन नाहरकत प्रमाणपत्र |

वरील सुविधांच्या व्यतिरिक्त महानगरपालिका वेळोवेळी निश्चित करेल अशा सुविधा सेतु सुविधा केंद्रा मार्फत (महा-ई सेवा केंद्रा मार्फत) पूरविण्यात येतील.

वरील सेवा पुरविण्यासाठी सेतू सुविधा केंद्र (सी.एम.एस.) औरंगाबाद महानगरपालिकेच्या संगणक प्रणालीशी संलग्न करून महा-ई-सेवा केंद्र यांचे मार्फत या सुविधांचा वापर करण्यास शासन निर्णया प्रमाणे सुविधा शुल्क आकारणी करून पुरविण्यात येणार आहेत. यामध्ये महानगरपालिकेला कोणत्याही प्रकारचा खर्च करावा लागणार नाही. उलटपक्षी जर अशी सुविधा केंद्रे महानगरपालिके तर्फे विविध भागांमधून सुरू करावयाचे झाल्यास प्रती केंद्रास अंदाजे रू.१,२५,०००/- एवढा खर्च अपेक्षित आहे. तो खर्च ही सुविधा उपलब्ध करून दिल्या नंतर वाचणार आहे.

या उपक्रमाव्दारे नागरिकांना चांगल्या प्रकारची आधुनिक पध्दतीचा वापर करून विविध सुविधासाठी करांचा भरणा करणे शक्य होणार आहे. या सुविधा मिळण्यासाठी सुविधेचा लाभ घेणाऱ्यास रू.२०/- अ सेवा कर आकारण्यात येणार आहे. याकरिता शहरात विविध ठिकाणी सुरु असलेल्या महा-ई-सेवा केंद्रामार्फत सुविधा उपलब्ध करून देणे तसेच वरील सर्व सेवा महानगरपालिकेच्या उपलब्ध असलेल्या संगणक प्रणालीचा वापर करून ऑन-लाईन पेमेंटसाठी शासनाने निश्चित केलेल्या महा-ऑनलाईन या कंपनीकडून ई-पेमेंट गेटवे उपलब्ध करून घेण्याचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**मा.सभापती** **:महानगरपालिकेतर्फे महा ई सेवा केंद्र सुरू करत आहे त्याबाबत माहिती देण्यात यावी.**

**उपआयुक्त (म)** **:नागरीकांना कामाची गरज पडते त्यासाठी वार्ड कार्यालय, मुख्य कार्यालयात नागरीक संपर्क साधतात. मा.जिल्हाधिकारी यांच्या सहकार्याने महा ई सेवा केंद्रा मनपाच्या 22 सेवा ई केंद्रात पहिल्या टप्प्यामध्ये जोडणार आहोत. मालमत्ता कर ई सेवा केंद्रातुन भरता येणार आहे. कर भरण्यासाठी नागरीक गेले असता अधिकारी/कर्मचारी काही कारणास्तव जागेवर नसल्याकारणाने त्याचा उत्पन्नावर परिणाम होतो. त्यामुळे ही अडचण होऊ नये म्हणुन मनपाच्या सेवा महा ई सेवा केंद्राना जोडणार आहे. ज्यांना हया सेवेमध्ये भाग घ्यावयाचा आहे त्यांना 22 ते 22 रूपये 50 पैसे द्यावे लागणार आहे. जन्म दाखला लागत असल्यास घराजवळील महा ई सेवा केंद्रात जाऊन अर्ज दाखल करण्यात येईल. व प्राप्त अर्ज मनपाकडे दिले जातील व प्रमाणपत्र तयार करून पुन्हा महा ई सेवा केंद्रामध्ये दिले जातील. स्लिपवर दिल्या जाणाऱ्यावर प्रमाणपत्र देण्याची तारीख दिली जाईल. 40 केंद्रावर सेवा देण्यात येणार आहे. मनपाचे वेगवेगळे टॅक्स इंटरनेटच्या माध्यमातुन शासनाची महा ई ऑन लाईन च्या माध्यमातुन गोळा करण्याचा म्हणजेच ई पेमेंटद्वारे पैशांची भरणा करता येईल. आपल्याला रेडीमेट पायाभुत सुविधा मिळणार आहे.**

**मा.सभापती** **:40 केंद्रांची माहिती देण्यात यावी.**

**उपआयुक्त(म)** **:असे वाटत असेल की सेवा जवळ असावी त्यावेळेस केंद्रशासनाची सीएमएस कंपनीच्या माध्यमातुन सुविधा देऊ शकतो. मनपास खर्च करण्याची गरज नाही.**

**मा.सभापती** **: विषय मंजुर.**

**ठराव :**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,** महानगरपालिकेच्या वार्ड अ ते फ मधून जन्म व मृत्यू प्रमाणपत्र, बेबाकी प्रमाणपत्र मालमत्ता कर वसुली, पाणीपट्टी कर वसुली तसेच इतर विभागाकडून वेगवेगळया सुविधा महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णय क्रमांक मादस/२०१२/प्रक्र-१५२/३९, दिनांक २३ मे २०१२ नुसार सेतू सुविधा केंद्रामार्फत या सुविधा नागरिकांना उपलब्ध करून देण्यासाठी आधुनिक पध्दतीचा वापर करून विविध सुविधासाठी करांचा भरणा करणे शक्य होणार असल्यामुळे सुविधा मिळण्यासाठी सुविधेचा लाभ घेणाऱ्यास रू.२०/- अ सेवा कर आकारण्यात येणार असून याकरिता शहरात विविध ठिकाणी सुरु असलेल्या महा-ई-सेवा केंद्रामार्फत सुविधा उपलब्ध करून देणे तसेच वरील सर्व सेवा महानगरपालिकेच्या उपलब्ध असलेल्या संगणक प्रणालीचा वापर करून ऑन-लाईन पेमेंटसाठी शासनाने निश्चित केलेल्या महा-ऑनलाईन या कंपनीकडून ई-पेमेंट गेटवे उपलब्ध करून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**याच बरोबर मा.सभापती यांनी राष्ट्रगीताने सभा संपल्याचे घोषित केले.**

**नगर सचिव,**
**महानगरपालिका औरंगाबाद**